मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करावयाच्या
कालव्यावरील बांधकामाच्या संकल्पन
संकल्पचित्र संदर्भातील तरतुदीतील सुधारणा.

महाराष्ट्र शासन
पाटबंधारे विभाग
शासन परिपत्र क्र. सीडीए १०९५/२०१९/(४९/९५) मोप्र (प्र)
दिनांक . १७ ऑक्टोबर १९९६.

संदर्भ - १. शासन परिपत्रक क्र. सीडीए १०८४/(३८५/८४) पीआरजे-(२)
दि. ३१ डिसेंबर १९८४.
२. शासन पत्र क्र. सीडीओ १०८७/७५१/(४४४/८७) मोप्र (प्र)
दि. २०.४.१९८८.
३. शासन पत्र क्र. सीडीओ १०९५/२०२९/(४९/९५) मोप्र (प्र)
दि. १.७.१९९६.

पूर्वपिठीका -

उपरोक्त (१) येथील संदर्भिय परिपत्रकातील परिच्छेद ३ (ए) मधील तरतुदीप्रमाणे कालव्यावरील ज्या बांधकामाची किंमत ५० लक्ष रुपयापेक्षा जास्त असेल अशा बांधकामाचीच संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने करावीत असे आदेश देण्यात आले होते. उपरोक्त (२) येथील संदर्भिय परिपत्रकानुसार १९८४ च्या परिपत्रकातील या संदर्भातील तरतुदीमध्ये बदल करण्यात येऊन कालव्यावरील बांधकामाची किंमत १ कोटी रुपयापेक्षा जास्त असेल तरच संकल्पचित्र मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने करावीत असे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात आले होते.

त्यानंतरच्या कालावधीत उपरोक्त संदर्भ (३) येथील शासन पत्रामध्ये मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने करावयाच्या कालव्यावरील बांधकामाच्या संकल्पचित्रासंदर्भात किंमतीची मर्यादा न ठेवता कालव्याची विसर्गक्षमता व स्तंभाची तळपातळी पासूनची उंची या भौतिक परिमाणांशी निगडीत मापदंड निर्गमित करण्यात आले होते. तथापि या शासन पत्रामध्ये अंतर्भूत असलेल्या मापदंडात काही उणीवा नजरेत आणून देण्यात आल्या होत्या. उदा. कालव्याचा विसर्ग ३५ घ.मी. /सेकंद ऐवजी ३५ घ.फू. /सेकंद असा मापदंड नजरचुकीने उल्लेखिण्यात आला होता. तसेच स्तंभाची तळपातळीपासूनची उंची असे नमुद करण्याऐवजी स्तंभाची जलपातळीपासुनची उंची असेही सदर परिपत्रकात नजरचुकीने नमूद झालेले आहे. शिवाय बांधकामाच्या किंमतीसदर्भात या
शासनपत्रात उल्लेख करण्याचे राहून गेले आहे. (वरील परिस्थितीत उपरोक्त संदर्भ (३) येथील पत्रान्वये निर्गमित केलेले मापदंड सुधारण्याचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधीन होता. या संदर्भात आता पुढील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

आदेश -

१.०) कालव्यावरील जी बांधकामे खाली नमूद केलेल्यापैकी कोणत्याही एका मापदंडात बसत असतील अशा बांधकामांची संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी करावीत.

अ) ज्या बांधकामाची किंमत रु ५० लक्ष ते १०० लक्ष इतक्या मर्यादित आहे, परंतु कालव्याचा विसर्ग ३५ घमी./सेकंद पेक्षा जास्त आहे, अशा कालव्यावरील बांधकामाचे (स्ट्रक्चरचे) संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करण्यात यावीत.

ब) कालव्यावरील बांधकामाच्या स्तंभाची (पियरची) तळपातळी (फाउंडेशन) पासूनची उंची जर १५ मी. अथवा त्यापेक्षा जास्त असेल तर अशा बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करावीत.

क) कालव्यावरील ज्या बांधकामाची किंमत १ कोटी रुपयापेक्षा जास्त असेल अशाही बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करण्यात यावीत.

ड) वरील व्यतिरीक्त कालव्यावरील ज्या बांधकामास नुकसान पोहोचल्यास त्यामुळे होणारे नुकसान (हॅझार्ड पोटेंशियल फ्रॉम स्ट्रक्चर) जर १ कोटी रुपयापेक्षा जास्त असेल तर अशाही बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत व्हावीत. मात्र कालव्यावरील अशा बांधकामाच्या फुटीमुळे होणा-या नुकसानी संदर्भात म्हणजेच हॅझार्ड पोटेंशियल संदर्भात, संबंधित मुख्य अभियंता यांना प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

२.० उपरोक्त सुधारीत आदेशाप्रमाणे कालव्यावरील बांधकामाच्या संदर्भातील संकल्पने व संकल्पचित्रे तयार करण्याबाबत मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक व क्षेत्रिय अधिका-यांनी कार्यवाही करावयाची आहे.

सही/-
(आ. अ. जवळेकर)
शासनाचे उपसचिव

प्रत -

पाटबंधारे विभागातील सर्व मुख्य अभियंता
पाटबंधारे विभागातील सर्व अधीक्षक अभियंता
पाटबंधारे विभागातील सर्व तांत्रिक कार्यासने/सर्व उपअभियंता पाटबंधारे विभाग, मंत्रालय
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेचे सर्व अधीक्षक अभियंता (५ जादा प्रतींसह)
मोप्र (प्र) कार्यासन संग्रहार्थ.